**दरपत्रक मागणीपत्र**

क्रमांक प्रबंधक/ पाणी कॅन मागणी /२० 4436
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ
दिनांक 10 SEP 2020

विषय - पो.अ. कार्यालय व शाखेकरीता सन २०२०-२१ करीता पाणी कॅन (ॲक्वा)आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरीता दरपत्रके सादर करणेबाबत.

----000-----

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार कळविण्यात येते की, पोलीस अधीक्षक कार्यालय व विविध शाखेकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेबाबत पाणी कॅन (ॲक्वा) चा पुरवठा करण्याकरीता १ वर्षाकरीता करार करण्यात येणार आहे. खालील नमुद वस्तुचे/दर बंद लिफाफा/पाकिटात अटी व शर्तीच्या प्रमाणपत्रासह दि. १४/९/२०२० पर्यत न चुकता कार्यालयात सादर करावेत.

(बंद पाकिट/लिफाफयावर पोलीस अधीक्षक कार्यालय करीता पाणी कॅन पुरवठा (ॲक्वा) दरकरार पत्रक असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. )

२/- सदर दरपत्रके पोलीस उप अधीक्षक गृह यांचे समक्ष दिनांक. १५ /०९/२०२० रोजी उघडण्यात येतील.

**खालील नमुन्यात पाणी कॅन चे दर नावासमोर दर्शविण्यात यावेत.**

| अ.क्र. | विवरण | सर्व करासहीत एकुण रक्कम. प्रती कॅनचे दर नमुद करावे |
|---|---|---|
| 1 | पाणी कॅन (ॲक्वा) १६ लिटर प्रती कॅन. (पिण्याचे पाणी पुरवठा) | |

**अटी व शर्ती**

१) मान्य केलेले दर १वर्षाकरीता वैध राहतील.

२) दररोज पाणी कॅनचा (ॲक्वा) पुरवठा पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ मधील विविध शाखेमध्ये दररोज २५ कॅनची आवश्यकता असणार आहे. सदर पाणी कॅनचा पुरवठा स्वखर्चाने (उदा.वाहतूक खर्च, हमाली खर्च. इ.) करावा लागेल. दरपत्रक धारकाला त्यांने दरपत्रकामध्ये सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव कोणत्याही प्रकारची दरवाढ करून देण्यात येणार नाही.

३) पाण्याच्या पुरवठा हा नियमीतपणे करावा लागेल. पाण्याच्या पुरवठा नियमीतपणे न केल्यास आपले देयक मंजुर करण्यात येणार नाही. पिण्याचे पाणी ॲक्वा व्यक्तीरिक्त असल्यास पाण्याची कॅन स्विकारण्यात येणार नाही.

४) प्रत्येक महीन्याचे देयके बिल क्रमांक, रक्कम निहाय विस्तृत अनुसुची/अनुक्रमणिका निहाय सादर करणे बंधनकारक राहील.

५) चालु वर्षाचा करार संपुष्टात आल्यानंतर पुढील वर्षासाठी दरपत्रक प्रकिया पुर्ण होईपर्यत पुरवठादाराला त्यांनी मान्य केलेल्या दरानेच पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहील.

६) पाणी कॅन ॲक्वा खरेदीची देयके शासनाकडुन प्राप्त होण्या-या अनुदाना प्रमाणे काढण्यात येतील. अनुदानाअभावी देयकास विलंब झाल्यास या कार्यालयाकडुन विलंब आकारणी या कार्यालयाकडुन अनुज्ञेय राहणार नाही. तसेच फर्मधारकास कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

(मा पो.अ. यांचे मान्यतेने)

(एम.एम.बागवान )
पोलीस उप अधीक्षक मुख्या.
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

**पोलीस निरीक्षक, सायबर सेल**

२/- सदर प्रसिध्दीपत्रक यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या बेवसाईटवर दि. १४/०९/२०१९ रोजीचे १७-०० वाजेपर्यत प्रसिध्द करावे.